माहितीचा अधिकार

# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर

(प्रशासकीय इमारत क्र.२, पहिला माळा, सिव्हिल लाईन्स, नागपूर)

---

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये प्राप्त झालेले व्दितीय अपील**

**अपील क्रमांक : ४१०/२०२५**

| **अपिलार्थी** | **प्रतिवादी** | |
|---|---|---|
| | **जन माहिती अधिकारी** | **प्रथम अपिलीय अधिकारी** |
| श्री. निखील विष्णुपंत बुटले, द्वारा-रमेश महाकुळकर, ८४/८५, बालाजी नगर (प), मानेवाडा रोड, नागपूर-२७ | सहा. अधिक्षक, आरोग्य विभाग, महानगर पालिका, नागपूर | वैद्यकिय आरोग्य अधिकारी, आरोग्य विभाग, महानगर पालिका, नागपूर |

**सुनावणी दिनांक :- ११.०७.२०२५**

**१. उपस्थिती –**

| अपिलार्थी | विद्यमान जन माहिती अधिकारी | तत्कालीन जन माहिती अधिकारी | विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी | तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| **उपस्थित** | **उपस्थित** | **अनुपस्थित** | **उपस्थित** | **अनुपस्थित** |

**२. व्दितीय अपील अर्ज –**

(१) व्दितीय अपील अर्जाचा दिनांक : १४.०२.२०२५

(२) व्दितीय अपील अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : १४.०२.२०२५

(३) व्दितीय अपील अर्जात नमूद केलेली कारणे : अपूर्ण व चुकीची माहिती मिळाल्यामुळे

(४)व्दितीय अपील अर्जान्वये केलेली विनंती : धाडी दरम्यान दि. ०४.०९.२०२४ ला बनलेले Inspection Report आणि फोटो मिळण्याबाबत व मुद्दा क्र. ३, ५ व ६ ची माहिती मिळण्याबाबत.

**३. माहिती अर्ज –**

(१) माहिती अर्जाचा दिनांक : ११.०९.२०२४

(२) माहिती अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : १२.०९.२०२४

(३) कोणत्या कालावधीची संबंधित माहिती हवी आहे तो कालावधी : कालावधी नमुद नाही

(४) जन माहिती अधिकारी यांचेकडे मागणी केलेली माहिती : "(१) Dr. Satish Sonar यांचे मालकीचे असलेले Sport Med. Nagpur या दवाखान्यात सायंकाळी ४/९/२४ ला वयोवृध्द भोयरबाई (रुग्ण) यांच्या खांदयावरती MRI च्या आधारवर डॉ हे दवाखान्याचे दरवाजे बंद करुन लपुन Non Qualified Staff ला घेऊन शस्त्रक्रिये सुरु असण्याच्या माहितीच्या आधारावर आपल्या विभागातून टाकलेले धाडी मध्ये जे Report Photo बनवलेली आहेत, त्याची प्रत मिळणेबाबत (२)आरोग्य विभागाने Dr. Satish Sonar यांना दिलेली नोटीसची प्रत मिळणेबाबत (३) आरोग्य विभागाने ४/९/२४ धाडी

दरम्यान भरती असलेले वयोवृध्द रुग्ण भोयरबाई (खांदयावरती शस्त्रक्रिया झालेले) यांना शस्त्रक्रिया नंतर हॉस्पीटल मध्ये Qualified Staff कडून मिळणारी Treatment and Supervision साठी दुसऱ्या कोणत्या Hospital मध्ये Rescue करुन भरती केलेत आणि त्यांना Discharge Card, Implant Card, Medicine Bills, Surgery Bill etc प्राप्त करुन रुग्ण ला मिळवून दिले असल्यास त्याची सविस्तर माहिती (४) Dr. Sonar यांनी नोटीस ला दिलेला उत्तराची प्रत मिळणेबाबत (५) Dr. Satish Sonar हे वारंवार रुग्णाची उपचारामध्ये हेयगये करुन फसवणूक करत असून Sport Med- Nagpur या दवाखान्यत Surgery करत आहेत, त्याला बळी पडणाऱ्या रुग्णासाठी आरोग्य विभागातून काढलेले प्रेस नोटची प्रत Staff Sumit Sonar, Shubhangi Kanholkar, Building Watchman ची घेतलेली बयानची प्रत मिळणेबाबत (६) Dr. Sonar वरती झालेला कारवाईचा स्वरुप आणि प्रत मिळणेबाबत" इत्यादी एकुण ६ मुद्दयांवर माहिती मागितलेली आहे.

(५) जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही : जन माहिती अधिकारी यांनी जोडपत्र-अ नुसार दिनांक ०७.१०.२०२४ च्या पत्रान्वये अपिलार्थीस "माहिती अर्जात नमुद केलेली मुद्दा क्र. १, २, ४ व ६ ची माहिती पुरविली असून मुद्दा क्र. ३ ची आकास्मीक भेटी दरम्यान रुग्णवरील उपचाराबाबत अपेक्षीलेली माहिती दस्ताऐवजात उपलब्ध नसल्याने निरंक आहे व मुद्दा क्र. ५ ची माहिती निरंक असल्याने पुरविणे शक्य नाही" असे कळविले आहे.

**४. प्रथम अपील –**

(१) प्रथम अपील अर्जाचा दिनांक : २८.१०.२०२४

(२) प्रथम अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : २८.१०.२०२४

(३) प्रथम अपील दाखल करण्याचे कारण : चुकीची व अपूर्ण माहिती मिळाल्यामुळे

(४) अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपील अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही : प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपील अर्जावर दिनांक १२.११.२०२४ रोजी सुनावणी घेऊन "कार्यालयीन दस्तावेजात उपलब्ध असलेल्या नस्तीमधील माहिती, माहिती अधिकार अर्जाअंतर्गत अनुज्ञेय संपूर्ण दस्तावेज अपिलकर्त्यास देण्यात आले असल्याने अपील निकाली काढण्यात येत आहे" असे नमुद करुन आदेश पारीत केले.

**५. युक्तीवाद/लेखी खुलासा –** आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलकर्ता उपस्थित असून त्यांनी आयोगासमक्ष कथन केले की, जन माहिती अधिकारी यांनी जोडपत्र-अ नुसार अपूर्ण व चुकीची माहिती दिलेली आहे.

त्यावर उपस्थित जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक, श्री. विजय थुल व प्रथम अपिलीय अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी, डॉ. दिपक सेलोकर यांनी स्पष्ट केले की, सदर प्रकरणी दिनांक ०४/०९/२०२४ रोजी ज्या घटनास्थळी छापा घातला गेला त्या कारवाईचा अहवाल दिनांक ०५.०९.२०२४ रोजी तयार करण्यात आलेला आहे व त्याची प्रत अपिलार्थीस पुरविण्यात आली आहे.

६. **निष्कर्ष :—** सदर प्रकरणी दिनांक ०४/०९/२०२४ रोजी ज्या घटनास्थळी छापा घातला गेला त्या कारवाईचा अहवाल दिनांक ०५.०९.२०२४ रोजी तयार करण्यात आलेला आहे व त्याची प्रत अपिलार्थीस पुरविण्यात आली आहे, असे प्राधिकरणातर्फे सांगण्यात आले. परंतु अपिलकर्ता यांना ज्या तारखेला घटनास्थळी तपासणी करण्यात आली, त्याच तारखेच्या कारवाईच्या अहवालाची प्रत अपेक्षीत आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस मागितलेल्या माहितीबाबत अवलोकनाची संधी देवून माहिती उपलब्ध करुन द्यावी. तथापि, त्यानंतरही अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्यास दिनांक ०४.०९.२०२४ या तारखेला झालेल्या कारवाईचा अहवाल दिनांक ०५.०९.२०२४ रोजी तयार करण्यात आला आहे, असे अपिलार्थीस लेखी पत्रान्वये कळविणे अपेक्षीत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. जन माहिती अधिकारी यांनी सदर आदेश मिळाल्यापासून १५ दिवसात अर्जदारास निरिक्षणाकरीता पत्राद्वारे वेळ व दिनांक कळवून निरिक्षणाची संधी द्यावी. निरिक्षणाअंती अपीलार्थी यांनी निवड केलेली ५०पृष्ठे विनामुल्य देवून इतर पृष्ठांकरीता नियमानुसार शुल्क आकारण्यात यावे. तसेच त्यानंतरही अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्यास दिनांक ०४.०९.२०२४ या तारखेला झालेल्या कारवाईचा अहवाल ०५.०९.२०२४ रोजी तयार करण्यात आला आहे, असे अपिलार्थीस लेखी पत्रान्वये कळवून त्याची पोच आयोगास पाठवावी.

२. वरील निष्कर्षावरुन प्रस्तुत व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

Gnimdeo

**(गजानन निमदेव)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : ११.०७.२०२५**

जावक क्रमांक 4138 दिनांक 25 AUG 2025